**<u>(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)</u>**

**[१९९६] २ एस. सी. आर. ७४७**

**अब्दुल अझीझ अब्दुल राजाक आणि अन्य**

**विरुद्ध**

**बृहमुंबई महानगरपालिका आणि अन्य**

**फेब्रुवारी १५, १९९६.**

**[ न्यायमूर्ति के. रामास्वामी आणि न्यायमूर्ति जी. बी. पटनायक]**

*भूमिसंपादन अधिनियम , १८९४ आणि १९८४ चा ६८ वा विशोधन अधिनियम :*

*कलम ११ -व्याज -हक्क असणे - व्याज भरण्यासाठी अधिकाऱ्यांनी केलेला करार - असे मत व्यक्त करण्यात आले की : भूमि संपादन अधिकारी, ज्यांना करारानुसार व्याज देण्याचा अधिकार आहे - जरी विशोधन अधिनियम वाढीव व्याजदराचा लाभ देत असला तरी, व्याज भरण्याच्या त्यांच्या करारानुसार पक्षांना तो मिळण्याचा हक्क नाही.*

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक ३८१९ / १९९६.

एल. ए. आर. क्रमांक ३४/ १९८४ मधील अपील क्रमांक ४१४ / १९९२ मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक १४.०७.९४ च्या निकाल आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी आर. पी. भट्ट आणि रमेश बाबू एम. आर.

उत्तरवादींसाठी भीमराव एन. नाईक आणि डी. एन. मिश्रा.

न्यायालयाने पुढील आदेश दिलाः

अनुमती मंजूर झाली. आम्ही दोन्ही बाजूंचे अधिवक्त्याना ऐकले आहे.

भूमिसंपादन अधिनियम १८९४ चा पहिला च्या कलम ४ (१) अंतर्गत अधिसूचना १९८१ मध्ये प्रकाशित करण्यात आली होती आणि कलम ११ अंतर्गत निवाडा दिनांक ९ मे १९८४ रोजी देण्यात आला, ज्यामध्ये रु ११० प्रति चौरस यार्ड या दराने नुकसान भरपाई देण्यात आली. कलम १८ अंतर्गत दिलेल्या निर्देशनानुसार , विद्वान एकल न्यायाधीशांनी दिनांक १९ फेब्रुवारी १९९२ रोजीच्या निवाडा आणि हुकूमनाम्याद्वारे नुकसानभरपाई ३०० रुपये प्रति चौरस यार्ड पर्यंत वाढवली, परंतु पक्षांमधील करार लक्षात घेऊन व्याज नाकारले. त्यामुळे असमाधानी होऊन, अपीलकर्ता १४ जुलै १९९४ रोजीच्या अपील क्र ११४/९२ मधील उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध हे अपील विशेष अनुमतीद्वारे घेऊन आले आहे.

१९८४ च्या ६८व्या विशोधन अधिनियम खालील  सुधारित व्याजासाठी अपीलकर्ते पात्र आहेत का हा एकमेव प्रश्न आहे. हे मान्य आहे की, अपीलकर्त्यांनी एक करार केला होता आणि त्याचा संबंधित भाग खालीलप्रमाणे आहेः

" या कराराची अंमलबजावणी झाल्यावर  खाली नमूद केलेल्या पहिल्या अनुसूचीत अधिक विशेषतः वर्णन केलेल्या या मालमत्तेसाठी ४० रुपयांच्या अंतरिम दराने मोजल्या जाणाऱ्या नुकसानभरपाईच्या दोन तृतीयांश म्हणजे ९८,४८० रुपये ( अठ्याण्णव  हजार चारशे ऐंशी रुपये ) महानगरपालिका भरेल आणि भूमिसंपादन अधिनियम , १८९४ अंतर्गत दिल्या जाणाऱ्या नुकसानभरपाईची उर्वरित रक्कम मालकांना ताब्यात घेतल्याच्या तारखेपासून वार्षिक ४ टक्के दराने व्याजासह दिली जाईल."

त्याचे वाचन स्पष्टपणे सूचित करते की कराराच्या अंमलबजावणीवरील पहिल्या अनुसूचीमध्ये विशेषतः वर्णन केलेल्या ४० रुपये प्रति चौरस यार्ड या दराने मोजल्या जाणाऱ्या नुकसानभरपाईच्या केवळ दोन तृतीयांश म्हणून ९८,४८० रुपयांची रक्कम भरण्यास ते सहमत होते. उर्वरित रकमेसाठी त्यांनी अधिकाऱ्यांना अधिनियमांतर्गत नुकसान भरपाई देण्याची विनंती केली. परंतु त्यांनी ताब्याच्या  तारखेपासून वार्षिक ४ टक्के दराने व्याज भरण्यासाठी करार केला.

अधिनियमाच्या कलम ११ चे पोटकलम (२) खालीलप्रमाणे आहेः

"(२) पोटकलम  (१)  मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, जर कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला जिल्हाधिकाऱ्यांची अशी खात्री पटली की, जमिनीत हितसंबंध असलेल्या ज्या व्यक्ती त्याच्या पुढे आलेल्या असतील अशा सर्व व्यक्तींचे समुचित शासनाने केलेल्या नियमावलीद्वारे विहित केलेल्या प्ररूपात जिल्हाधिका-याने द्यावयाच्या निवाड्यात अंतर्भूत करावयाच्या बाबीसंबंधी  लेखी करार झाला आहे तर तो पुढे आणखी चौकशी न करता,अशा कराराच्या तरतुदींनुसार भरपाईचा निवाडा देऊ शकेल."

त्यामुळे, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, भूमि संपादन अधिकाऱ्याला, अधिकाऱ्यांनी केलेल्या करारानुसार व्याज देण्याचा अधिकार आहे. वाढीव

व्याजदराचा लाभ देत विशोधन अधिनियम  लागू झाला असला तरी, अपीलकर्त्यांना त्यांच्या करारानुसार वाढीव व्याज मिळण्याचा हक्क नाही.

त्यानुसार अपील  फेटाळली जाते.  खर्च बसविण्यात आला नाही.

जी. एन                                                                अपील  फेटाळण्यात आली.

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा  वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".